**सामान्य प्रशासन विभाग/विचौ-२**

**शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या इच्छुक व पात्र अधिकाऱ्यांना कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकाऱ्यांच्या यादीत (पॅनलवर) नियुक्ती देण्याबाबत**

**पहावे :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१३.०३.२०२५
२) दै.लोकमत/लोकसत्ता मध्ये प्रसिध्द जाहिरात दि. ३०.०३.२०२५

शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिस्तभंगविषयक प्रकरणांतील विभागीय चौकशी पूर्ण करण्यासाठी राज्य शासन सेवेतून (गट-अ आणि गट-ब) निवृत्त झालेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांमधून इच्छुक व पात्र अधिकाऱ्यांची या विभागाच्या कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या यादीत (पॅनलवर) नियुक्ती करावयाची आहे.

**अर्ज करण्यासाठीचे निकष/पात्रता** :-

१) अर्ज करणारे अधिकारी शासन सेवेतून **(गट-अ/गट-ब) राजपत्रित** पदावरुन निवृत्त झालेले असावेत.
२) सहाव्या वेतन आयोगानुसार किमान ग्रेड वेतन ५००० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार किमान वेतनस्तर एस-१९ असावा.
३) सेवानिवृत्त होताना किंवा झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही प्रलंबित नसावी.
४) चौकशी कामात व्यत्यय येईल अशा इतर सेवेत/ व्यवसायात गुंतलेला नसावा.
५) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**इतर अटी व शर्ती :-**

- इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी **दि. ३० एप्रिल, २०२५** अखेरपर्यंत सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज (विवरणपत्रासह) सादर करावेत.
- अर्जदारांनी अर्जासोबत, विहीत विवरणपत्रातील माहिती, ते ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले, त्या प्रशासकीय विभागाकडून साक्षांकित करुन पाठविणे **अनिवार्य** आहे.
- ऑनलाईन/प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम अधिकार सामान्य प्रशासन विभागाचा राहील.

- या विभागाच्या कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या पॅनलवर समावेश करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास ज्या शिस्तभंगविषयक प्राधिकरणांकडून चौकशी प्रकरणे सोपविण्यात येतील त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या ठिकाणी/कार्यालयांत चौकशीचे कामकाज पार पाडावे लागेल.
- इतर अटी व शर्ती, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१३.०३.२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.
- पॅनलवर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांनी, त्यांच्याकडे चौकशी प्रकरण प्राप्त झाल्यावर विहित कालावधीत चौकशी पूर्ण करुन, अहवाल संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहील. अहवाल सादर केल्यानंतर संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकरणांकडून विहित तरतुदींनुसार मानधन व इतर भत्ते अदा करण्यात येतील.
- पॅनलवर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांनी, त्यांच्याकडील कामाचा त्रैमासिक अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.
- इच्छुक अधिकाऱ्यांनी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांच्या नावे desk11a-gad@mah.gov.in या मेल आयडी वर आपला अर्ज (विहित विवरणपत्रातील माहितीसह) सादर करावा.
- अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३१२१/ ०२२-२२७९३८९५ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.

**अर्जाचा विहित नमुना :-**

| | | |
|---|---|---|
| .१ | अधिकाऱ्याचे नाव | |
| .२ | जन्मदिनांक | |
| .३ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| .४ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| .५ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन सातव्या / वेतन आयोगानुसार वेतनस्तर | |
| .६ | ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभागकार्यालय/ | |
| .७ | संबंधित प्रशासकीय विभाग | |
| .८ | सध्याचा निवासी पत्ता | |
| .९ | मोबाईल क्रमांक | |
| .१० | ई मेल आयडी | |
| .११ | सेवेत असताना चौकशीची प्रकरणे हाताळली आहेत का | |
| .१२ | सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का | |
| .१३ | चौकशी अधिकारी म्हणून कोणत्या महसूली विभागात काम करावयाचे आहे | |

**विहित विवरणपत्र सोबत जोडले आहे.**

कल्याणी धारप

**(कल्याणी धारप)**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

## विवरणपत्र -२

## कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी पदावरील नियुक्तीकरीता इच्छुक अधिकाऱ्याची माहिती

| अ. क्र. | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे पूर्ण नाव व जन्मदिनांक | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा निवासी पत्ता व दूरध्वनी क्रमांक | सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद व सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन/ सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवेत कार्यरत असताना किंवा सेवानिवृत्त होताना त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही सुरु होती किंवा कसे (असल्यास तपशील द्यावा), विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाहीत शिक्षा झाली होती किंवा कसे (असल्यास तपशील द्यावा) | सेवेत कार्यरत असताना त्यांनी विभागीय चौकशीचे काम हाताळले आहे किंवा कसे | सेवेत असताना काम केलेले प्रशासकीय विभाग | कोणत्या महसूली विभागांत काम करण्याची इच्छा आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी व नाव (क.अ./अ.स.)
प्रशासकीय विभागाचे नाव